| PUBLICATION | Sakal | EDITION | - |
|---|---|---|---|
| DATE | 29.4.2014 | PAGE.NO. | 3 |
| TITLE | Sunteck cha Nava Prakalp | SUPPLEMENT | |

# सॅनटेकचा नवा प्रकल्प



नागपूर : सिग्ना स्काइजचे सादरीकरण करताना सुझान रोशन, कमल खेतान.

नागपूर, ता. २८ : पिरॅमल सॅनटेक रिॲलिटी प्रायव्हेट लिमिटेडच्या सिग्ना स्काइज प्रकल्पाचे सादरीकरण आज आघाडीच्या अंतर्गत डिझायनर सुझान रोशन आणि सॅनटेक रिॲलिटीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक कमल खेतान आणि चित्रपट अभिनेते कबीर बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

हा प्रकल्प सदर छावणी परिसरात असून, त्यात २४ डिझाइन्स संकल्पनेतील फ्लॅटचा समावेश आहे. अतिशय आरामदायी 'सिग्ना स्काइज' योजना दहा मजली असून, यात फोर बीएचके फ्लॅट्स आहेत. शहरातील सर्वांत उंच निवासी इमारत असल्याचा दावा कमल खेतान यांनी केला. आकर्षक नैसर्गिक आणि आरामदायी फ्लॅट्स यामध्ये आहेत. सिग्ना स्काइजमध्ये ग्रीन लॅण्डस्केप राहणार आहे. अपार्टमेंटची अंतर्गत सजावट इंटेरियर डिझायनर सुझान रोशन हिने केली. सुझानच्या चारकोल प्रोजेक्टच्या साहाय्याने हा प्रकल्प पूर्ण करण्यात आला. संपूर्ण वातानुकूलित प्रवेशद्वार आणि नावीन्यपूर्ण सुविधा हे आमच्या प्रकल्पाचे वैशिष्ट्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रकल्पात लाइव्ह किचन, लॅण्डस्केप गार्डन, अत्याधुनिक जिम, पुल, हेल्थ क्लब आणि स्पा, योगा सेंटर तसेच आरामदायी निवासासाठी 'सिग्ना स्काइज' अत्याधुनिक आहे, असे कबीर बेदी यांनी सांगितले.